# उद्यान विभाग

उत्तरदायित्व विवरणपत्र सन २०१०-११

(कार्यउद्देश अर्थसंकल्प माहिती पुस्तिका सन २०१०-११ नुसार)

| अ. क्र. | कार्यबाबी | उत्तरदायित्व कार्यउद्दिष्टे | माहे सप्टेंबर २०१० अखेर साध्य प्रगती कार्य उद्दिष्टये |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | **उद्याने विकसित करणे** | विविध प्रकारची उद्याने विकसित करणे (आयुर्वेदिक/गुलाब/जपानी/नक्षत्र/एनर्जी इ.) एकूण १०० उद्याने नागरिकांसाठी खुली करण्याचे उद्दिष्ट आहे. | विकसित केलेली उद्याने = ८३ |
| २ | **वृक्ष गणना** | महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन व संरक्षण १९७५ कलम ४ मधील वृक्ष प्राधिकरणाची कर्तेव्ये कलम ७ (क) (ख) अंतर्गत पुणे मनपाच्या हद्दीतील एकूण २४३.८४ चौ. कि.मी. क्षेत्रावरील सर्व वृक्षांची गणना करणे | १०० चौ. कि. मी. क्षेत्रातील वृक्ष गणनेचे काम पूर्ण झालेले आहे व यामध्ये एकूण १९,८१,३५५ इतकया वृक्षांची गणना झालेली आहे. |

| अ. क्र. | कार्यबाबी | उत्तरदायित्व कार्यउद्दिष्टे | माहे सप्टेंबर २०१० अखेर साध्य प्रगती कार्य उद्दिष्टये |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| ३ | **वृक्षारोपण** | | |
| | १) संयुक्त वनव्यवस्थापन प्रकल्प राबविणे – | वन विभागाच्या ९८८.१८ एकर क्षेत्रावर वनव्यवस्थापन व वृक्षारोपण करणे | भांबुर्डा – १२५०<br>पांचगांव पर्वती– १५५०<br>इतक्या स्थानिक जातीच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. |
| | २)जैवविविधता उद्यान | महसुल विभागाकडून मनपाकडे ताब्यात आलेल्या जमिनीवर मृदु संधारणाची कामे करणे, वृक्ष लागवड करणे, संरक्षण करणे व अस्तित्वातील जैवविविधतेचे संवर्धन करणे .<br>एकूण ५४६.५० एकर क्षेत्रावर १०,००० वृक्षांची लागवड करणे. | बाणेर – १०००<br>पंचवटी–३३००<br>पाषाण – ३५००<br>इतकी वृक्ष लागवड केलेली आहे. |
| | ३) नदी, नाले, तलाव, रस्ते व मोकळया जागा इ. ठिकाणी वृक्षारोपण करणे | ८८,००० इतक्या वृक्षांच्या लागवडीचे उद्दिष्ट ठेवण्यात आलेले आहे. | २६,६८२ इतक्या वृक्षांची लागवड करण्यात आलेली आहे. |
| | ४) स्मृतीवन प्रकल्प | स्मृती जपण्यासाठी कोथरुड कचरा डेपो येथे निसर्ग सेवक संस्था व पुणे महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने हा प्रकल्प राबविण्यात येत आहे. नागरिकांच्या आवडत्या व्यक्तीच्या स्मृती प्रित्यर्थ ६.५ एकर जागेवर एखादा वृक्ष दत्तक घेऊन त्याची जोपासणा करणे. | या प्रकल्पांतर्गत एकूण १७०० स्मृती वृक्षांची लागवड करण्यात आलेली आहे. |
| | ५) वृक्षांचे पुनर्रोपण | विकसनाच्या कामामध्ये अडथळा ठरणा–या जुन्या वृक्षांचे पुनर्रोपण करणे. | माहे सप्टेंबर २०१० अखेर ६१८ वृक्षांचे पुनर्रोपण करण्यात आलेले आहे. |

| अ. क्र. | कार्यबाबी | उत्तरदायित्व कार्यउद्दिष्टे | माहे सप्टेंबर २०१० अखेर साध्य प्रगती कार्य उद्दिष्टये |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| ४ | **जनजागृती –**<br>शहरातील नागरिकांमध्ये पर्यावरणाविषयी आवड निर्माण करणे व शहरामध्ये जास्तीत जास्त वृक्ष लागवडीस उदयुक्त करणे . | १) फळे, फुले व भाजीपाला प्रदर्शन – | प्रती वर्षी माहे फेब्रुवारी मध्ये पुणे मनपामार्फत सदर प्रदर्शन आयोजित केले जाते. |
| | | २)शहरातील पर्यावरण क्षेत्रात काम करणाऱ्या खाजगी संस्थास फळे, फुले व भाजीपाला प्रदर्शन आयोजित करण्यास मदत | पुना वुमेन्स कॉन्सिल,पुणे यांना छ.संभाजीराजे उद्यान, शिवाजीनगर येथे प्रदर्शन आयोजित करण्याकरिता उद्यान मोफत उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. |
| | | ३) हरित पुणे पुरस्कार –<br>वृक्ष लागवड व संवर्धन या क्षेत्रात काम करणा–या संस्थास प्रोत्साहन करणेकरिता व शहरात मोठया प्रमाणात वृक्ष लागवड होणे करिता शहरात १००० वृक्षांचे तीन वर्षापर्यंत यशस्वी संवर्धन करणा–या खाजगी संस्था/ नागरिक यांना पुरस्कार देऊन गौरविणे. | सन.२००९ – २०१० चा हरित पुणे पुरस्कार फर्ग्युसन कॉलेज शिवाजीनगर व मध्यवर्ती करागृह,येरवडा यांना विभागून देण्यात आलेला आहे. |

| अ. क्र. | कार्यबाबी | उत्तरदायित्व कार्यउद्दिष्टे | माहे सप्टेंबर २०१० अखेर साध्य प्रगती कार्य उद्दिष्टये |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | | ४) प्रशिक्षण वर्ग व कार्यशाळा आयोजित करणे . शहरातील नागरिक, संस्था , शालेय विद्यार्थी , मनपा सेवक व इतर मध्ये पर्यावरणाविषयी आवड निर्माण होण्याकरिता विविध कार्यशाळांचे आयोजन करणे. | मनपामार्फत नव्याने बांधण्यात आलेली इंद्रधनुष्य पर्यावरण केंद्र या इमारतीमध्ये पर्यावरणासंबंधी विविध विषय – जागतिक तापमान वाढ, जागतिक पर्यावरण दिन इ.विषयी चर्चा सत्रे व माहितीचे कार्यक्रम घेण्यात आलेले आहेत. |
| | | ५) किल्ले स्पर्धा व प्रदर्शन , चित्रकला व निबंध स्पर्धा यांचे आयोजन करणे | शालेय विद्यार्थ्यामध्ये इतिहास व पर्यावरण विषयी आवड व जनजागृती निर्माण होण्याकरिता प्रतीवर्षी स्पर्धांचे आयोजन केले जाते. |
| | | ६) पुणे मनपा शाळांमध्ये रोपवाटिका प्रकल्प राबविणे . | शालेय विद्यार्थ्यामध्ये पर्यावरण विषयी आवड निर्माण करण्याकरिता शाळांचे मागणीनुसार रोपे लागवडीसाठी कुंडया, रोपे व इतर साहित्य पुरविण्यात आले आहे. |

| अ. क्र. | कार्यबाबी | उत्तरदायित्व कार्यउद्‌दिष्टे | माहे सप्टेंबर २०१० अखेर साध्य प्रगती कार्य उद्‌दिष्टये |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | | ७) ट्री फेस्ट चे आयोजन करणे | झाडांचे संरक्षण व संवर्धन याबाबत माहिती तसेच वृक्ष लागवडीबाबत जनजागृती निर्माण होणेकरिता सप्टेंबर २०१० मध्ये ट्री फेस्ट हा नवीन उपक्रम राबविण्यात आला आहे. यामध्ये झाडांच्या माहितीचे प्रदर्शन, पुस्तकांची विक्री, कविता वाचन, नेचर वॉक, वृक्ष परिचय व चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे. |
| | | ८) रोपवाटीका प्रकल्पांतर्गत रोपांचे वाटप करणे. | वृक्ष प्राधिकरण, पुणे मनपाने शहरात दोन रोपवाटीका स्थापन केल्या आहेत. यामधून वनमहोत्सव,धार्मिक सण व इतर महत्वाच्या दिवसानिमित्त मोफत, अल्पदारात शोभेची, सावलीचे, आयुर्वेदिक इ. प्रकारच्या रोपांचे वाटप करण्यात येते. याअंतर्गत आजतागायत ४७,५५९ इतक्या रोपांचे वाटप करण्यात आलेले आहे. |
| | | ९) वन्यजीव सप्ताहाचे आयोजन करणे. | स्व. राजीव गांधी प्राणीसंग्रहालयात १ ऑक्टोबर ते ७ ऑक्टोंबर २०१० हा सप्ताह वन्यजीव सप्ताह म्हणून साजरा करण्यात आला आहे. या सप्ताहामध्ये शालेय विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. |

| अ. क्र. | कार्यबाबी | उत्तरदायित्व कार्यउद्दिष्टे | माहे सप्टेंबर २०१० अखेर साध्य प्रगती कार्य उद्दिष्टये |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | | १०) शाळांसाठी कार्यक्रम आयोजित करणे | ‘ओळख प्राणीसंग्रहालयाची ’ या कार्यशाळेचे महिन्यातून एकदा आयोजन करण्यात येत आहे. |
| ५ | **महसुल जमा करणे** | १) वृक्ष कर– पुणे मनपा हद्दीमध्ये मिळकत कराबरोबर महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जतन अधिनियम १९७५ या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी (१%) वृक्ष कर आकारणे<br>उद्दिष्ट ५.५० कोटी. | र. रु. ४.३१ कोटी जमा |
| | | २) रोपे , लाकूड व फळबहार विक्री यामधून अंदाजे र. रु. २.०० लक्ष महसुल जमा करणे | र. रु. १,६०,००० /– प्रत्यक्ष महसुल जमा आहे. |
| | | ३) तडजोड फी– वृक्ष तोडीबाबतची तडजोड फी, स्टॉल भाडे इ. | र. रु. १,५३,०००/– इतकी रक्कम जमा झालेली आहे. |
| | | ४) उद्यानांमध्ये झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रम व शुटींग,फोटोग्राफी | र. रु. ५१,०००/– जमा झालेले आहेत. |

| अ. क्र. | कार्यबाबी | उत्तरदायित्व कार्यउद्दिष्टे | माहे सप्टेंबर २०१० अखेर साध्य प्रगती कार्य उद्दिष्टये |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | | ५) उद्यान तिकीट विक्री – | स्व.राजीव गांधी प्राणीसंग्रहालयास प्रवेश शुल्कापोटी सन २००९–२०१० मध्ये र. रु. १,३९,१३,६८४ इतकी रक्कम जमा झालेली आहे. |
| ६ | **प्राण्यांसाठी खंदक करणे –** | प्राणी संग्रहालयात असणा–या १९ खंदकांमध्ये वाढ करुन २१ खंदक निर्माण करणे. | प्राणी संग्रहालयाच्या पुढील दहा वर्षाचा नियोजित मास्टर प्लॅन नुसार विकास केला जाणार आहे. |
| ७ | **प्राणी अनाथालय** | जखमी झालेल्या प्राण्यांवर उपचार करणे व निसर्गात पुन्हा सोडून देणे. | ५७८ प्राण्यांवर उपचार करण्यात आलेले आहेत. |
| ८ | **प्राणी दत्तक योजना** | जनसामान्यांमध्ये वन्यप्राण्यांविषयी आवड व जिव्हाळा निर्माण व्हावा तसेच वन्यप्राणी संवर्धन प्रक्रियेत नागरिकांना प्रत्यक्ष सहभाग घेता यावा. | ७ नागरिकांनी विविध प्राणी दत्तक घेतलेले आहेत. व यापासून ७०,०००/– रुपये दत्तक शुल्क प्राप्त झालेले आहे. |
| ९ | **पर्यावरण** | १) पर्यावरण सद्यस्थिती अहवाल – मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ६७ (अ) नुसार दर वर्षी ३१ जुलै पुर्वी मान्य मुख्य सभेस पर्यावरण अहवाल सादर करणे<br>पुणे शहरातील नागरिकांना शहराच्या पर्यावरणाची सद्यस्थिती अवगत करणे . | दि. २८ जुलै २०१० रोजी मा. मुख्य सभेस पर्यावरण अहवाल सादर करण्यात आला आहे. |
| | | २) पर्यावरण प्रयोगशाळा –<br>पुणे शहरातील हवा, नदीचे पाणी, व ध्वनी प्रदुषण संबंधी नमुने घेऊन प्रयोगशाळेमध्ये तपासणी करणे | पुणे मनपाच्या पर्यावरण प्रयोगशाळेमध्ये दरमहिन्याला हवेतील धुलीकण, गॅसेस तसेच नदीच्या पाण्यातील बीओडी, सीओडी, इ. घटकांची तपासणी करण्यात आली आहे. |